महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

सुचना क्र.- ३ दिनांक : ०२/०७/२०२६

पोलीस आयुक्त, कार्यालय, ठाणे शहर.
पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५.

-: नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी गैरहजर असलेल्या उमेदवारांसाठी सुचना :-

विषय :- ठाणे शहर पोलीस शिपाई भरती २०२४-२५

-----ooooo-----

पोलीस आयुक्त, ठाणे शहर या घटकाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची ६५४ रिक्त पदे भरण्याकरिता पोलीस शिपाई भरती २०२४-२५ प्रक्रिया राबविण्यात आली होती. कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून गुणवत्तेनुसार पोलीस शिपाई यांची अंतिम तात्पुरती निवड यादी/अंतिम तात्पुरती प्रतिक्षा यादी दि.२२/०५/२०२६ रोजी जाहिर करण्यात आली आहे.

तद्नंतर उमेदवारांची वैद्यकिय तपासणी, चारित्र पडताळणी व समांतर आरक्षण कागदपत्रांमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती निकषाच्या अधिन राहून व आवश्यक त्या प्रशासकिय बाबी विचारात आपणास दि.०१/०७/२०२६ रोजी नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी सुचना क्र.१ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु आपण सदर कालावधीत हजर राहिला नाहीत.

तरी आपणास पोलीस शिपाई पदावर हजर होण्याकरिता दि.०२/०८/२०२६ पर्यंत अंतिम संधी देण्यात येत आहे. त्यामुळे आपण नियुक्ती आदेश स्विकारण्याकरीता ठाणे शहर पोलीस मुख्यालय, खारकर आळी, कळवा ब्रीज जवळ, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१ येथे दिलेल्या कालावधी पर्यंत न चुकता हजर रहावे. आपण दिलेल्या कालावधीपर्यंत हजर न राहील्यास आपणास शासकीय नोकरीची आवश्यकता नाही असे गृहित धरुन पुढील एकतर्फी निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पोलीस शिपाई					
अ. क्र.	चेस्ट क्र.	उमेदवाराचे नाव	मुळ प्रवर्ग	निवड प्रवर्ग	निवड समांतर आरक्षण
1	९८२०	कृष्णा दत्तु सदगीर	इमाव	इमाव	सर्वसाधारण
2	५७८३	हरिदास परमेश्वर अनारसे	इमाव	खुला	प्रकल्पग्रस्त
3	२०२०७	सुनिल नामदेव खंडझोडे	अजा	अजा	माजी सैनिक

मा. अपर पोलीस आयुक्त
(प्रशासन) यांच्या मान्यतेने

(मिना मकवाणा)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-१)
पोलीस आयुक्त, ठाणे यांचे कार्यालय

Scanned with CamScanner